नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
**मराठी भाषा विभाग**
**राज्य मराठी विकास संस्था**
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६**
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता **rmvs_mumbai@yahoo.com** , project3.rmvs@gmail.com

# आवाहन

## ‘बृहन्महाराष्ट्रातील संस्था / मंडळांना अर्थसाहाय्य योजना’ सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याने २०१० साली स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ “भाषा आणि साहित्य” याअंतर्गत - बृहन्महाराष्ट्र या विभागात बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने ‘बृहन्महाराष्ट्रातील संस्था/ मंडळांना अर्थसाहाय्य योजना’ राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येत आहे.

“महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यता प्राप्त संस्था / मंडळांना तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसाहाय्य देण्यात येईल.”

राज्य मराठी विकास संस्थेने या योजनेअंतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यात मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था / मंडळांना रु. ५०.०० लक्ष (प्रत्येकी रु. २.०० लक्षच्या मर्यादेत) अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसाहाय्य देण्यासाठी पात्र संस्था/मंडळांकडून दिनांक १०/०७/२०२५ ते १०/०८/२०२५ या विहित कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेसंदर्भातील कार्यपद्धती व निकष, बृहन्महाराष्ट्रातील मंडळे यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना, इतर तपशील विहित नमुन्यात गुगल अर्ज (Google Form) राज्य मराठी विकास संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या व महाराष्ट्र शासनाच्या http://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर ‘नवीन संदेश’ या सदरात **‘बृहन्महाराष्ट्रातील संस्था/ मंडळांना अर्थसाहाय्य योजना’ २०२५-२६** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत

सदर अर्थसाहाय्याचे गुगल अर्ज (Google Form) विहित नमुन्यात व विहित कालावधीत दि.१०/०७/२०२५ ते १०/०८/२०२५ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे. अंतिम तारखेच्या कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

महाराष्ट्र राज्याबाहेरील बृहन्महाराष्ट्रात मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मंडळे तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांना सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

# “बृहन्महाराष्ट्रातील संस्था / मंडळांना अर्थसाहाय्य योजना” सन २०२५-२६

## कार्यपद्धती व निकष

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याने २०१० साली स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ ‘भाषा आणि साहित्य’ याअंतर्गत - बृहन्महाराष्ट्र या विभागात बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने खालील मुद्दा समाविष्ट करण्यात आलेला आहे.

**बृहन्महाराष्ट्र मंडळे साहाय्य :** - ‘महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसाहाय्य देण्यात येईल.’

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत राबविण्यात येणारी उपरोक्त योजना, राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील ‘अन्य राज्यात व परदेशात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम करणे’ ह्या उद्दिष्टाचाच भाग असल्याने, मराठी भाषा विभागाने, दिनांक १३ जून २०१६ रोजी शासन निर्णय क्रमांक : रासांधो-२०१६/प्र.क्र.८९/२०१६/भाषा-३ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेकडे वर्ग केली आहे.

या योजनेअंतर्गत, महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्थांना / मंडळांना **५०.०० लक्ष (प्रत्येकी रु. २.०० लक्षच्या मर्यादेत)** (प्रत्येकी रु. २ लक्षच्या मर्यादेत) अर्थसाहाय्य करणे व त्याअनुषंगाने, १७ एप्रिल २०१५ च्या शासन निर्णयाच्या आधारे, संस्थेच्या स्तरावर विहित कार्यपद्धती व निकष निश्चित करणे राज्य मराठी विकास संस्थेच्या विचाराधीन होते.

त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती व निकष तसेच अर्थसाहाय्यासाठी अर्ज करणाऱ्या बृहन्महाराष्ट्रातील मंडळे/ संस्था यांसाठीच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे ठरविण्यात येत आहेत.

**कार्यपद्धती व निकष :-**

### (अ) बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था/ मंडळे यांना अर्थसाहाय्य देण्याबाबतची कार्यपद्धती :-

१. महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथप्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसाहाय्य देण्याच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेने, दरवर्षी वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या अर्जांचा अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी विचार केला जाणार नाही, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा. **संस्थेच्या नियोजनानुसार या योजनेची जाहिरात देऊन अर्ज मागवण्याचा दिनांक व कालावधी यात बदल करण्याचे अधिकार संस्थेला असतील.** सदर जाहिरात / निवेदन राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळांवरही प्रसिद्ध करावी.

२. सदर जाहिरातीस अनुसरून बृहन्महाराष्ट्रातील मंडळे / संस्था यांनी त्यांचा प्रकल्प/उपक्रम/योजना यांबाबतचे सविस्तर टिपण (अंदाजित आर्थिक तपशिलासह) परिशिष्ट अ मध्ये जोडलेल्या विहित अर्जासह राज्य मराठी विकास संस्थेकडे विहित कालमर्यादेत ऑनलाईन भरून पाठवणे आवश्यक आहे.

३. राज्य मराठी विकास संस्थेने, प्राप्त झालेले अर्ज प्रकल्प व वित्त समितीची मान्यता घेऊन, कार्यकारी समितीच्या बैठकीत अंतिम निवड करण्यासाठी सादर करावेत व सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या, पात्र ठरलेल्या मंडळांना/ संस्थांना संस्थेच्या प्रचलित धोरणानुसार अर्थसाहाय्य/ अनुदान वितरित करावे.

**(आ) अर्थसाहाय्यासाठी / अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या संस्थांकरिता/ मंडळांकरिता निकष :-**

१. राज्य मराठी विकास संस्थेकडे प्राप्त होणाऱ्या, महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांच्या तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथप्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांच्या अर्जाचा अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी विचार करण्यात येईल.

२. सदर अर्जदार संस्था / मंडळ हे बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या शिखर संस्थेशी संलग्न असणे बंधनकारक आहे.

३. या योजनेअंतर्गत कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम किंवा स्थावर मालमत्ता निर्माण करण्यासाठी अर्थसाहाय्य दिले जाणार नाही. जर एखाद्या अर्जदार संस्था अथवा मंडळाची प्रस्तावित योजना अथवा उपक्रम हा मंडळासाठी जमीन विकत घेणे, कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करणे अथवा अन्य स्वरूपाची स्थावर मालमत्ता निर्माण करण्यासंदर्भातील असेल तर त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४. जर महाराष्ट्राबाहेरील एका राज्यातून एकापेक्षा अधिक मंडळे / संस्था यांच्याकडून साहित्य संमेलनासंबंधीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास, त्या राज्यातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी सर्वाधिक योग्य प्रस्तावाचा विचार केला जाईल. महाराष्ट्राबाहेरील एका राज्यातून जास्तीत जास्त एकाच साहित्य संमेलनाला अर्थसाहाय्य (२ लक्ष रुपयांच्या मर्यादेत) करण्यात येईल.

५. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्याकडून ज्या बाबींसाठी अर्थसाहाय्य देण्यात येते त्यांसाठी या योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य दिले जाणार नाही.

६. या योजनेंतर्गत अर्थसाहाय्य मिळण्याच्या अनुषंगाने अर्जदार साहित्य संस्था/ मंडळे यांनी परस्पर महाराष्ट्र शासनाच्या इतर कोणत्याही विभागास वा मंडळास अर्ज सादर न करता, विहित नमुन्यात व विहित कालावधीत राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

७. अर्जदार संस्था/मंडळे, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे, तसेच सोसायटी कायदा व कंपनी कायदा कलम ८ अन्वये संबंधित प्राधिकरण अथवा विभागाकडे नोंदणीकृत असाव्यात. मालकी हक्काने चालविण्यात येणाऱ्या संस्था/ मंडळे अर्थसाहाय्यास/ अनुदानास पात्र असणार नाहीत.

८. अर्थसाहाय्यासाठी/ अनुदानासाठी अर्ज करणारी बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यातील) साहित्य संस्था किंवा मंडळ किमान ५ वर्षे मराठी भाषा, साहित्य वा प्रकाशन क्षेत्रांमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.

९. अर्जदार मंडळे / संस्था यांनी अर्जासोबत प्रस्तावित उपक्रमाचे सविस्तर प्रकल्प टिपण (Detail Project Note), सविस्तर आर्थिक अंदाजपत्रकासह पाठविणे बंधनकारक आहे. संक्षिप्त वा केवळ प्रकल्प विषय नमूद केलेले टिपण विचारात घेतले जाणार नाहीत. प्रकल्पासाठी येणाऱ्या खर्चासाठीचा स्वहिस्सा कसा उभारणार याबाबतचा सविस्तर तपशीलदेखील टिपणीसोबत जोडणे आवश्यक असेल.

१०. अर्जदार मंडळे / संस्था यांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या पाच वर्षांच्या कामाचा अहवाल जोडणे आवश्यक राहील.

११. राज्य मराठी विकास संस्थेतर्फे मंजूर होणारे अर्थसाहाय्य / अनुदान फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल व यासंदर्भातील अनुदानाचे सर्वसाधारण नियम व अटी संस्थांना लागू होतील.

१२. अर्जदार संस्थेने आपले ध्येयधोरण स्पष्ट केल्यानंतर व यासंदर्भातील अर्थसाहाय्यासाठीचा/ अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केल्यावर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

१३. अर्जदार संस्थेने ज्या विषयासंदर्भात अर्थसाहाय्यासाठीचा / अनुदानासाठी अर्ज केला आहे त्याविषयासाठी इतर कोणत्याही शासकीय, निमशासकीय विभागाने / संस्थेने / मंडळाने अर्थसाहाय्य केलेले नसावे.

१४. अर्जदार संस्थेने मागील किमान ३ वर्षांचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) लेखापरीक्षित केलेले लेखा अहवाल राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल अर्जदार संस्थेचा / मंडळाचा सदस्य नसावा.

१५. वरील निकषांच्या आधारे अर्जदार संस्थांची निवड करण्याचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेस असतील.

**(इ) अनुदान / आर्थिक साहाय्याचे टप्पे व अटी आणि शर्ती :-**

१. ज्या अर्जदार संस्था अथवा मंडळांना या योजनेअंतर्गत २ लक्ष रुपयांच्या मर्यादेत, जे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल, ती अनुदानित रक्कम एकाच वेळी १०० टक्के वितरित केली जाणार नाही तर त्या अनुदानित रकमेचे दोन टप्प्यात(मंजुरीनंतर ६० टक्के व उपक्रम पार पडून संबंधित संस्था / मंडळ यांनी प्रकल्पाशी संबंधित सर्व कागदपत्रे राज्य मराठी विकास संस्थेस सादर केल्यानंतर शेवटी ४० टक्के) वितरण VPDA द्वारे सदर संस्था अथवा मंडळे यांच्या बँक खात्यात केले जाईल.

२. राज्य मराठी विकास संस्थेच्या निकषांनुसार ज्या अर्जदार संस्था अथवा मंडळांना या योजनेअंतर्गत २ लक्ष रुपयांच्या मर्यादेत, जे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल त्यासंदर्भातील राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकृत पत्र, इ-पत्रांच्या दिनांकानंतर संबंधित उपक्रम करणे बंधनकारक असेल. अधिकृत पत्र प्राप्त होण्याच्या आधी केलेले उपक्रम अर्थसाहाय्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.

३. अर्जदार संस्था / मंडळ यांना ज्या प्रकल्पासाठी, उपक्रमासाठी या योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे, त्या प्रकल्पाच्या, उपक्रमाच्या सर्व साहित्यावर 'या उपक्रमास/ प्रकल्पास राज्य मराठी विकास संस्थेतर्फे 'बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसाहाय्य योजना' या अंतर्गत अर्थसाहाय्य प्राप्त झाले आहे.' असा स्पष्ट उल्लेख राज्य मराठी विकास संस्थेच्या मुद्रेसह (Logoसह) करणे बंधनकारक असेल.

४. अर्जदार संस्थेस ज्या उपक्रमासाठी, कार्यक्रमासाठी सदर योजनेतून आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आले आहे, त्या कार्यक्रमातून, उपक्रमातून निर्माण झालेले साहित्य, ग्रंथ, साधने इत्यादी राज्य मराठी विकास संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य मराठी विकास संस्थेला असतील.

५. अर्जदार संस्थेने, संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या अर्थसाहाय्य / अनुदानातून करण्यात येत असलेल्या कामाचा नियतकालिक अहवाल दर तीन महिन्यांनी राज्य मराठी विकास संस्थेस सादर करणे बंधनकारक असेल. अन्यथा सदर संस्था पुढील काळात अनुदान मंजुरीसाठी अपात्र ठरेल.

६. राज्य मराठी विकास संस्थेने दिलेल्या निधीचा उपयोग विशिष्ट कारणासाठीच करण्यात येणार असल्याचे उपयोजन प्रमाणपत्र अर्जदार संस्थेने/ मंडळाने देणे बंधनकारक राहील.

७. राज्य मराठी विकास संस्थेने ज्या कारणासाठी अर्थसाहाय्य / अनुदान मंजूर केले आहे त्याच कारणासाठी वापरणे बंधनकारक आहे. ते अन्य प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही, असे केल्यास ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व अशा संस्था / मंडळ यांच्याविरुद्ध गैरव्यवहाराची कारवाई करण्यात येईल.

८. राज्य मराठी विकास संस्थेने दिलेल्या अर्थसाहाय्याच्या/ अनुदानाच्या खर्चाचा हिशोब शासनमान्य अधिकृत लेखापालाकडून सादर करणे अर्जदार संस्थेस बंधनकारक राहील. तसेच त्या वर्षातील जमाखर्चाचा तपशील, खर्चाची मूळ देयके तसेच पावत्या, विनियोजन विवरणपत्रासह विहित कालमर्यादेत, अनुदान मंजूरीच्या वित्तीय वर्ष अखेरपर्यंत राज्य मराठी विकास संस्थेस सादर करणे बंधनकारक राहील.

९. फक्त रु. ५००० इतक्या रकमेच्या मर्यादेतील खर्चाची खर्च पावती (व्हाऊचर) ग्राह्य धरण्यात येईल. त्यापुढील खर्च रकमेचे मूळ देयक पाठवणे बंधनकारक असेल.

१०. अर्जदार संस्थेकडील अर्थसाहाय्याबाबतची सर्व कागदपत्रे व हिशोब संचालक, राज्य मराठी विकास संस्था मुंबई किंवा त्यांचे अधिकारी तसेच महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई किंवा त्यांचे अधिकारी यांना तपासण्याचा अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

**(ई) अर्थसाहाय्य / अनुदान मिळण्यासाठी संस्था/ मंडळे यांसाठी मार्गदर्शक सूचना :-**

१. मराठी भाषेचे अंगभूत सामर्थ्य ओळखून, आधुनिक गतिमान युगातील आव्हाने पेलण्यासाठी मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून सर्वांगाने विकसित करण्याचा विचार व प्रयत्न व्हावा.

२. मराठी भाषा, बोली या विषयांसदर्भातील नावीन्यपूर्ण दिशादर्शक संशोधन, पुस्तके, कोश, संगणकीय साधने (सॉफ्टवेअर्स, ॲप्स इ.) व संगणकीय सामग्री (ध्वनिमुद्रिते, चित्रिकरणे, संगणकीय मजकुर इ.) तयार करून ती प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्न करावा.

३. बृहन्महाराष्ट्रातील ज्या राज्यात मंडळ/ संस्था कार्यरत आहे त्या भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या बोली भाषा, साहित्य व संस्कृतीचा विचार करून त्यासंदर्भातील विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न व्हावा.

४. केवळ साहित्यावरील चर्चा व परिसंवाद एवढेच कार्यक्रमाचे स्वरूप असू नये तर मराठी भाषा आणि इतर भारतीय भाषा यांच्यामध्ये परस्पर साहित्य तसेच भाषिक व्यवहार वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.

५. विविध ज्ञानशाखांमधील अद्ययावत ज्ञान मराठी भाषेत येण्यासाठी अनुवाद, भाषांतर, परिभाषा निर्मिती, सर्वेक्षणे यांसदर्भात विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

६. त्या त्या राज्यांतील शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मराठी भाषा व साहित्याची गोडी लागावी यासाठी विविध प्रकारची शालेय साधने, संदर्भसाधने यांची निर्मिती करावी तसेच वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

७. राज्य मराठी विकास संस्थेच्या उद्दिष्टांना पूरक असे उपक्रम, योजना राबवाव्यात

## परिशिष्ट – अ

### बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यातील) संस्थेने /मंडळाने अर्थसाहाय्यार्थ/ अनुदानार्थ करावयाच्या ऑनलाईन अर्जाचा नमुना

**(गुगल अर्जाद्वारेच अर्जदारांनी (Google Form) अर्ज भरणे बंधनकारक आहे. सदर अर्थसाहाय्याचे गुगल अर्जचा (Google Form) नमुना पुढील प्रमाणे आहे. गुगल अर्जाद्वारे (Google Form) दि.१०/०७/२०२५ ते १०/०८/२०२५ या कालावधीत पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.)**

१) संस्थेचे / मंडळाचे नाव व पत्ता (संपर्क क्रमांक व इ-पत्त्यासह) :-

२) संस्था/ मंडळाचा/ नोंदणी क्रमांक व दिनांक :-

३) संस्था /मंडळाचे स्वरूप, कार्यक्षेत्र व उद्देश :-

४) संस्थेची/ मंडळाची घटना/ नियमावली आहे का? असल्यास, त्यास शासन मान्यता आहे काय? (घटनेची प्रत जोडावी. - जोडपत्र -१) :-

५) संस्थेचे / मंडळाचे कार्यकारी मंडळ आहे काय? असल्यास, कार्यकारिणीच्या सदस्यांची नावे व पत्ते (यादी सोबत जोडावी. - जोडपत्र – २) :-

६) संस्था / मंडळांनी मागील ३ वर्षातील योजना, कार्यक्रम यासंबंधीचे तपशील (जोडपत्र – ३) :-

७) प्रस्तावित प्रकल्प/ उपक्रम/ योजना यांचे संक्षिप्त वर्णन (अंदाजित आर्थिक तपशिलांसहित प्रकल्पाचे सविस्तर टिपण अर्जासोबत जोडावे – जोडपत्र – ४) :-

८) प्रस्तावित प्रकल्प/ उपक्रम/ योजना यांना इतर शासकीय विभाग, निमशासकीय अथवा खाजगी संस्था/ मंडळे यांचे अनुदान मिळाले आहे काय ? असल्यास माहिती द्यावी. :-

९) सनदी लेखापालाकडून संस्थेचे लेखापरीक्षण करून घेतलेले आहे काय? असल्यास, मागील तीन वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत सादर करावी. (जोडपत्र – ५) :-

१०) संस्था / मंडळ अर्थसाहाय्यास/ अनुदानास पात्र ठरल्यास अर्थसाहाय्याची रक्कम ऑनलाईन जमा करण्यासाठी (VPDA) साठी संस्थेच्या / मंडळाच्या/बँकखात्याचा अचूक तपशील/ रद्द केलेला धनादेश व पॅन कार्ड छायाप्रत जोडणेआवश्यक राहील. :- खातेधारकाचे नाव -

बँकेचे नाव -
शाखा -
खाते क्रमांक -
IFSC -
MICR -
संपर्क क्रमांक -

प्रमाणित करण्यात येते की, मंडळातर्फे/ संस्थेतर्फे देण्यात आलेली वरील सर्व माहिती सत्य आहे. सदर माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, संस्था कार्यवाहीस अपात्र ठरविण्यात यावी व सदरहू मंडळास/ संस्थेस कोणत्याही प्रकारचे अर्थसाहाय्य देऊ नये किंवा यापुढेही देण्यात येऊ नये.

दिनांक :
ठिकाण :

आपला,

( )
अध्यक्ष/ सचिव

संस्थेचा/ मंडळाचा शिक्का